MHSO060006832020

**विशेष दिवाणी दावा क्र. १६६/२०२०**

पांडुरंग शेलार (बिरामणे) व इतर

*विरुध्द*

सतिश मोरे

**निशाणी क्र.२४ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दि.०७.०९.२०२१ रोजीचा विना कैफियत तसेच दि. १९.०३.२०२२ रोजीचा विना उलटतपास हा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे कथन आहे की, सन २०२१ मध्ये कोविड रोगाच्या प्रादुर्भावामुळे कामकाज बंद होते. तसेच प्रतिवादी हे आजारी असल्याने व प्रतिवादीस कागदपत्र उपलब्ध न झाल्याने, प्रतिवादी दाव्यात कैफियत दाखल करु शकले नाहीत. दाव्याचा निकाल गुणवत्तेवर होण्याकामी प्रतिवादीस संधी देण्यात यावी. प्रतिवादी अर्ज मंजूर करण्याची विनंती करतो.

२. वादीने त्याचे म्हणणे (निशाणी क्र.२६) दाखल केले. वादीने अर्जातील सर्व प्रतिकुल कथने नाकारली. वादीने कथन केले की, प्रतिवादीने कैफियत देणेकामी व उलटतपास घेणेकामी जाणीवपुर्वक टाळाटाळ केलेली आहे. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या विधिज्ञांचा लेखी युक्तिवाद (निशाणी क्र.२७) विचारात घेतला. दावा हा दि. २८.०८.२०१८ रोजीच्या खरेदीखताबाबत घोषणा मिळण्यासाठी तसेच कायमच्या मनाई हुकूमासाठी आहे. सदरील खरेदीखत हे वादींनी प्रतिवादीस लिहून दिल्याचे प्रथमदर्शनी दिसते. फसवणुकीच्या मुद्दयावर सदरील खरेदीखत वादींनी आव्हानित केलेले आहे. सबब, सदरील बाब पाहता तसेच वादींनी पुराव्यासाठी घेतलेला अवधी पाहता, प्रतिवादीस संधी देणे योग्य होईल. करिता, खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रु.१,०००/– खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. निशाणी क्र. १ वरील दि. ०७.०९.२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

NILESH SUBHASH BUDRUK

Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2024.12.06 11:23:47 +0530

दिनांक : ०५/१२/२०२४

(नीलेश सु. बुद्रुक)

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,

पंढरपूर.

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | 2nd Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 05.12.2024 |
| (d) | Uploaded on | : | 06.12.2024 |